**पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ**
**प्रेसनोट दिनांक :- १०/०३/२०२३**

---

## यवतमाळ पोलीसांचे अथक परीश्रमाने होळी व धुलीवंदन शांततेत पार पाडले.

दि. ०६/०३/२०२२ रोजी होळी सण शांततेत व उत्साहात पार पाडला. होळी सणाचे नीमीत्ताने दि. ०६/०३/२०२२ रोजी सायंकाळी ठीकठीकाणी होलीका दहन करण्यात आले, होळी दहन दरम्यान कुठलीहि अप्रिय घटना घडु नये याकरीता पोलीसांकडुन परीसरामध्ये सतत पेट्रलींग करण्यात आली. तसेच होळीचा उत्सव शांततेत पार पडण्यासाठी, मा. डॉ. पवन बनसोड, पोलीस अधिक्षक, यवतमाळ, यांचे आदेशाने रेकॉर्ड वरील गुन्हेगारांना डीटेन करुन वेळीच प्रतीबंधक कार्यवाहि करण्यात आली, सर्व पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी त्यांचे परीसरातील शांतता समीती सदस्य, सरपंच, प्रतीष्ठीत नागरीक यांच्या बैठकी घेउन सुचना देण्यात आल्यात, होळी व धुलीवंदन शांततेत पार पाडणे करीता मद्यप्रेमीं कडुन दारु पीउन गैरक्रुत्य घडवुन आणु नये याकरीता होळी सणाचे दरम्यान केवळ तीन दिवसांमध्ये ५०० च्या वर दारुच्या केसेस दाखल केल्या. ठीकठीकाणी सतर्क पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला. सतत पोलीस पेट्रोलींग करण्यात आली, सर्व धाबे, हॉटेल्स चेक करण्यात आले. ज्यामुळे गालबोट लागेल अशी कुठलीहि अप्रीय घटना होळी व धुलीवंदन दरम्यान घडली नाहि, सर्व नागरीकांच्या सहकार्याने होळी व धुलीवंदन शांततेत पार पडला याकरीता यवतमाळ पोलीस विभागाकडुन सर्व जनतेचे विशेष आभार मानले जात आहे. तसेच पोलीस विभागाकडुन सर्व जनतेस पुढिल सणसंमारंभामध्ये शांतता राखण्याचे व पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

दि. ०६/०३/२०२२ होळी व दि. ०७/०३/२०२२ धुलीवंदन शांततेने पार पडण्याकरीता मा. डॉ. पवन बनसोड, पोलीस अधिक्षक, यवतमाळ, श्री. पीयुश जगताप, अप्पर पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे मार्गदर्शना खाली, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन चे प्रभारी अधीकारी, पोलीस मुख्यालय, पोलीस नियंत्रण कक्ष, येथील कार्यरत पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, यवतमाळ यांचे सतर्क कर्तव्याने पार पडली.

**शुभांगी रा. गुल्हाने**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय,**
**यवतमाळ.**